**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची मंगोलियाच्या राष्ट्राध्यक्षांबरोबर द्विपक्षीय चर्चा सुरु
- जागतिक स्तरावरच्या संघटनांमधे सुधारणा आवश्यक असल्याचं संरक्षण मंत्र्यांचं प्रतिपादन
- गाझा पट्टीतला संघर्ष थांबवून शांतता प्रस्थापित करण्याबाबतच्या जाहीरनाम्यावर स्वाक्षऱ्या / संघर्ष थांबल्याचं जगभरात स्वागत
- चालू आर्थिक वर्षात आतापर्यंत ११ लाख ८९ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त प्रत्यक्ष कर संकलन

**आणि**

- वेस्ट- इंडीज विरुद्ध दुसरा क्रिकेट कसोटी सामना जिंकून भारताने मालिकाही खिशात टाकली / कुलदीप यादव ठरला सामनावीर

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि मंगोलियाचे राष्ट्राध्यक्ष खुरेलसुख उखना यांच्यात नवी दिल्ली इथं द्विपक्षीय चर्चा सुरु आहे. या बैठकीत द्विपक्षीय संबंधांचा सविस्तर आढावा घेतला जाणार असून चर्चेनंतर काही सामंजस्य करारांवर स्वाक्षरी होणं अपेक्षित आहे. सांस्कृतिक, आध्यात्मिक आणि लोकशाही मूल्यांमधील समानतेमुळे १९५५ पासून गेली ७० वर्ष भारत आणि मंगोलिया यांच्यात बहुस्तरीय घनिष्ठ भागीदारी प्रस्थापित झाली आहे. प्रथमच भारत भेटीवर आलेले आज संध्याकाळी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना भेटणार आहेत. मंगोलियाचे अध्यक्ष उखना यांनी आज सकाळी नवी दिल्लीत राजघाटावर जाऊन राष्ट्रपिता महात्मा गांधींना आदरांजली वाहिली.

**<><><><><>**

संयुक्त राष्ट्रांच्या शांतिसेनेत योगदान देणाऱ्या देशांच्या प्रमुखांच्या संमेलनाला आज नवी दिल्ली इथं सुरुवात झाली. तीन दिवस चालणाऱ्या या परिषदेचं यजमानपद भारतीय लष्कराकडे आहे. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी या संमेलनात बोलताना, कालबाह्य झालेल्या आंतरराष्ट्रीय यंत्रणांमध्ये सुधारणांची गरज असल्याची भारताची भूमिका अधोरेखित केली. काही देश उघडपणे आंतरराष्ट्रीय नियमांचं उल्लंघन करत आहेत, तर काही देशांना या नियमांवर आपलं वर्चस्व ठेवायचं आहे. अशा परिस्थितीत नियमाधारित आंतरराष्ट्रीय व्यवस्था कायम ठेवण्यावर भारताचा भर आहे, असं प्रतिपादन त्यांनी केलं. शांतिसेनेतलं भारताचं योगदान त्यांनी अधोरेखित केलं आणि भारताच्या मते शांतिसेनेचं यश हे आकडेवारीवर नाही, तर त्यांच्या सुसज्जतेवर ठरतं, असं ते म्हणाले.

***होल्ड... बाईट- राजनाथ सिंह***

शांतिसेनेत योगदान देणाऱ्या देशांनी त्यांच्या कामात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा समावेश करून घेणं, सैन्यदलं तातडीनं तैनात करण्याची क्षमता वाढवणं आणि आपापसांतलं सहकार्य बळकट करणं यावर भर देण्याची गरज लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी यावेळी अधोरेखित केली. संयुक्त राष्ट्रांच्या एकंदर ७१ शांतता मोहिमांपैकी ५१ मोहिमांमध्ये भारताच्या तीन लाख महिला आणि पुरुष जवानांनी योगदान दिल्याची माहिती त्यांनी दिली.

**<><><><><>**

गाझा पट्टीत गेली दोन वर्ष सुरु असलेला संघर्ष थांबवून शांतता प्रस्थापित करण्याबाबतच्या जाहीरनाम्यावर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प, इजिप्त आणि तुर्कीएचे अध्यक्ष आणि कतारचे अमीर यांनी काल इजिप्त मध्ये शर्म अल-शेख इथं स्वाक्षरी केली. यावेळी ३०पेक्षा जास्त देशांचे नेते आणि प्रतिनिधी उपस्थित होते.

या शांतता शिखर परिषदेत अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प, इजिप्तचे अध्यक्ष अब्देल-फत्ताह अल-सिसी, तुर्कीएचे अध्यक्ष रेसेप तय्यप एर्दोगान आणि कतारचे अमीर शेख तमीम बिन हमाद अल थानी, यांनी हमास-इस्राएल युद्धबंदी कराराचे हमीदार म्हणून भूमिका बजावली. जगासाठी आणि मध्य-पूर्वेसाठी हा ऐतिहासिक दिवस असून, यासाठी स्थानिक नेत्यांचे आपण आभारी असल्याचं ट्रम्प यावेळी म्हणाले.

हा करार म्हणजे एका वेदनादायक अध्यायाचा शेवट असून, या प्रदेशात शांतता आणि स्थैर्याच्या नव्या युगाची सुरुवात असल्याचं अल-सिसी म्हणाले.
भारतातर्फे परराष्ट्र व्यवहार राज्यमंत्री कीर्ती वर्धन सिंग या शांतता शिखर परिषदेत सहभागी झाले होते. पश्चिम आशियात शांततेला भारताचा पाठिंबा आहे असं म्हणून ट्रम्प यांच्या शांतता प्रस्तावाला स्वीकृती देतानाच ओलिसांच्या सुटकेमधल्या इजिप्त आणि कतारच्या भूमिकेची भारतानं प्रशंसा केली आहे.

**<><><><><>**

पॅरिस करारातली उद्दिष्टं पूर्ण करण्यासाठी भारत वचनबद्ध असल्याचा पुनरुच्चार पर्यावरण, वनं आणि हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव यांनी केला. ब्राझीलिया इथं कॉप-३० परिषदेत ग्लोबल स्टॉक टेक संबंधीच्या सत्रात ते बोलत होते. ग्लोबल स्टॉक टेक म्हणजे पॅरिस करारातल्या अटीशर्तींच्या दिशेनं देशांनी केलेल्या कामाचं प्रगतीपुस्तक आहे. याच्या पहिल्या टप्प्यात उल्लेखनीय प्रगती नोंदवण्यात आली असून पॅरिस कराराच्या अंमलबजावणीसाठी सर्व संबंधित देशांची वचनबद्धता यातून दिसून येते, असं यादव म्हणाले.

**<><><><><>**

देशातल्या एकूण कमावत्या लोकसंख्येमधे महिलांचं प्रमाण गेल्या दहा वर्षांत मोठ्या प्रमाणात वाढलं असून २०२३-२४ मधे ते ४२ टक्के झाल्याची माहिती कामगार आणि रोजगार मंत्रालयानं दिली आहे. कमावत्या महिलांचं प्रमाण वाढण्यात

भारत ‘ब्रिक्स’ देशात आघाडीवर असल्याचं जागतिक बँकेच्या आकडेवारीत म्हटलं आहे. कौशल्य, पत आणि रोजगार वाढीसाठी राबवलेल्या धोरणांमुळे महिलांचं आर्थिक समावेशन शक्य झालं, सरकारी सेवांमधे कामाचं ठिकाण सर्वसमावेशक होण्यासाठी, महिला कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी शासन अनेक महिलाकेंद्रित उपक्रम राबवत आहे, असंही कामगार आणि रोजगार मंत्रालयानं निवेदनात म्हटलं आहे.

**<><><><><>**

२०२५-२६ या आर्थिक वर्षात आतापर्यंत ११ लाख ८९ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त प्रत्यक्ष कर संकलन झालं आहे. गेल्या आर्थिक वर्षाच्या तुलनेत कर महसुलात ६ पूर्णांक ३३ शतांश टक्के वाढ झाल्याची माहिती प्राप्तीकर विभागानं दिली आहे. १ एप्रिल ते १२ ऑक्टोबर या काळात कंपनी करापोटी सुमारे ५ लाख २ हजार कोटी, तर वैयक्तिक करापोटी सुमारे ६ लाख ५६ हजार कोटी रुपये महसूल जमा झाला आहे. समभाग हस्तांतरणावरच्या करातून ३० हजार ८७८ कोटी रुपये महसूल मिळाला आहे.

**<><><><><>**

निवृत्ती वेतन आणि निवृत्ती वेतनधारक कल्याण विभाग येत्या १ ते ३० नोव्हेंबर दरम्यान देशभरात चौथी डीएलसी, अर्थात संगणकीकृत हयातीच्या दाखल्यांची मोहीम राबवणार आहे. आतापर्यंतची ही सर्वात मोठी मोहीम असून, देशातले एकूण २ हजार जिल्हे आणि उप-विभागीय मुख्यालयांमध्ये ती राबवली जाईल. या टप्प्यात देशभरात २ कोटीपेक्षा जास्त निवृत्ती वेतन धारकांना डिजिटल हयातीचे दाखले वितरित करण्याचं उद्दिष्ट असून, निवृत्ती वेतनधारकांच्या सोयीसाठी फेस ऑथेंटिकेशन तंत्रज्ञानावर विशेष भर दिला जाईल.

**<><><><><>**

देशातल्या सर्व महानगरपालिकांमधे जमा होणाऱ्या कचऱ्याचा वापर महामार्गांच्या बांधकामासाठी केला जाईल, असं केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी म्हटलं आहे. ते काल चेन्नई मध्ये एका अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या दीक्षांत समारंभाला संबोधित करत होते. रस्ते बांधणीसाठी कचऱ्याचा वापर करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण योजना आखत असून २०२७ पर्यंत ती प्रत्यक्षात येईल असं ते म्हणाले.

देशात आतापर्यंत महानगरपालिकांच्या ८० लाख टन कचऱ्याचा वापर महामार्गांच्या बांधकामासाठी करण्यात आला असून, यामध्ये अहमदाबाद-पुणे राष्ट्रीय महामार्ग आणि मुंबई-दिल्ली राष्ट्रीय महामार्गाचा समावेश असल्याचं त्यांनी सांगितलं. केंद्रीय संशोधन संस्थेनं रस्ते बांधणीसाठी पशुधनापासून मिळवलेल्या बायो बिटुमेनचा दर्जा पेट्रोलियम बिटुमेनपेक्षा चांगला असल्याचं प्रमाणित केल्याचं ते म्हणाले. तसंच महानगरपालिकेच्या कचऱ्यासह विविध स्रोतांपासून हायड्रोजन मिळवण्यासाठी विविध संशोधन उपक्रम हाती घेण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

<><><><><>

भारतात तयार होणाऱ्या तीन कफ सिरपमधे भेसळ असल्याचं डब्लू.एच.ओ. म्हणजेच जागतिक आरोग्य संघटनेनं म्हटलं आहे. यात श्री सन फार्मासुटिकल्सचं कोल्डरिफ, रेडनेक्स फार्मास्युटिकल्सचं रेस्पिफ्रेश टीआर आणि शेप फार्माच्या रिलाइफ या औषधांचा समावेश आहे. अशा प्रकारची औषधं जगात कोठेही अशी औषधं आढळली तर ताबडतोब त्याची माहिती संबंधित यंत्रणेने द्यावी, असं आवाहन डब्ल्यूएचओने केलं आहे.

भारतात अलिकडेच कोल्डरिफ औषधाच्या सेवनानंतर काही मुलांचा मृत्यू झाल्यानंतर श्री सन फार्मास्युटिकल्स कंपनीचा उत्पादन परवाना रद्द करण्यात आला असून कंपनीच्या मालकाला अटक करण्यात आली आहे. अशी औषधं दोन ते पाच वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांना देऊ नयेत, असं जागतिक आरोग्य संघटनेनं

म्हटलं आहे. याबाबत केंद्र सरकारने सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत.

<><><><><>

डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी नागपूरच्या दीक्षा भूमीवर बुद्ध धम्माचा स्वीकार केला तो दिवस होता १४ ऑक्टोबर १९५६, विजयादशमी.

विजयादशमीला धम्मचक्रप्रवर्तन दिन साजरा केला जातो. आज तारखेनुसार या घटनेचा वर्धापन दिन असल्याने आजही दीक्षाभूमीवर आंबेडकर अनुयायी मोठ्या संख्येने येत आहेत.

<><><><><>

दक्षिण सुदानमध्ये आलेल्या पुरामुळे जवळजवळ ८ लाख ९० हजार नागरिक प्रभावित झाले असून, आतापर्यंत १९ जण मृत्युमुखी पडले आहेत. मुसळधार पाऊस आणि नाईल नदीच्या पाणी पातळीत वाढ झाल्यामुळे देशभरात पूरस्थिती निर्माण झाली आहे.

<><><><><>

क्रिकेटमधे वेस्ट इंडीजविरुद्धचा दुसरा कसोटी सामना भारताने ७ गडी राखून जिंकला असून ही मालिकाही २-० अशी जिंकली आहे. नवी दिल्लीच्या अरुण जेटली स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात आज खेळ सुरु झाला तेव्हा भारताला विजयासाठी ५८ धावांची आवश्यकता होती. ३ गड्यांच्या मोबदल्यात भारतीय संघाने १२१ धावा केल्या. वेस्ट इंडिज विरोधात कसोटी मालिकेतला भारताचा हा सलग १० वा विजय आहे. या सामन्यात कुलदीप यादव सर्वोत्कृष्ट खेळाडू ठरला, तर मालिकावीराचा मान रविंद्र जाडेजाला मिळाला.

//<><><><><>//